19 OCT 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकार क्षेत्रात करिअरची विद्यार्थ्यांना संधी : डॉ. शिर्के

## शिवाजी विद्यापीठ-जिल्हा नागरी बँक्स असोसिएशन यांच्यात सामंजस्य करार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सहकारी क्षेत्र मोठ्या प्रमाणात विस्तारत आहे, विद्यार्थ्यांना या क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्यादरम्यान सहकार्यवृद्धीच्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन यांच्यादरम्यान झालेल्या सामंजस्य कराराप्रसंगी कराराचे हस्तांतरण करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी. (छाया : पप्पू अत्तार)

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सामंजस्य करारामुळे शैक्षणिक तसेच बँकिंग क्षेत्रातील सहकार्याचा मार्ग अधिक विस्तारतो आहे, ही बाब महत्त्वाची आहे. यापुढील काळात सहकारी क्षेत्राकडे अधिक लक्ष केंद्रित करून त्यांच्या अपेक्षा जाणून घेऊन त्या दृष्टीने अभ्यासक्रमात समावेश करता येऊ शकेल. सहकारी क्षेत्रातील संधींबाबत विद्यार्थी अनभिज्ञ असतात. त्यांना त्याबाबत अवगत करून या क्षेत्रात येण्यास प्रोत्साहित करता येईल. त्यांनी सहकारी क्षेत्रात काम करण्यासाठी यावे, यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी सहकारचा अभ्यासक्रमात समावेश करण्याबाबत चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे म्हणाले, युवकांचा सहकार चळवळीत सहभाग वाढणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाने घेतलेला पुढाकार खूप महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बँकिंगची माहिती, अनुभव देण्याच्या दृष्टीने या करारांतर्गत निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील. त्यातून या क्षेत्राला चांगले मनुष्यबळ उपलब्ध होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अधिसभा सदस्य संजय परमणे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी असोसिएशनच्या वतीने निपुण कोरे यांनी, तर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी अनिल नागराळे, सूर्यकांत पाटील-बुद्धिहाळकर, शंकरराव मांगलेकर, डॉ. राजन पडवळ उपस्थित होते. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

19 OCT 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक, बँकिंगमधील सहकार्याचा मार्ग विस्तारणार

## नागरी बँक्स सहकारी असोसिएशनचा शिवाजी विद्यापीठाशी सामंजस्य करार

**सकाळ वृत्तसेवा**



**कोल्हापूर : सामंजस्य कराराप्रसंगी कराराचे हस्तांतर करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे. सोबत डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, संजय परमणे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. राजन पडवळ, सूर्यकांत पाटील-बुद्धीहाळकर, अनिल नागराळे, शंकरराव मांगलेकर, अरुण आलासे आदी.**

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्या आज सहकार्य वृद्धीच्या अनुषंगाने सामंजस्य करार झाला.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे उपस्थित होते. 'करारामुळे शैक्षणिक, बँकिंग क्षेत्रातील सहकार्याचा मार्ग अधिक विस्तारेल. सहकारी क्षेत्राकडे अधिक लक्ष केंद्रित करू. अपेक्षा जाणून त्यादृष्टीने अभ्यासक्रमात समावेश करता येऊ शकेल', असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'सहकारी क्षेत्रातील संधींबाबत विद्यार्थ्यांना माहिती देऊन क्षेत्रात येण्यास प्रोत्साहित करता येईल. शिकतानाच इंटर्नशिपची संधी देऊन प्रात्यक्षिकीय अनुभवाची संधी देता येईल.'

निपुण कोरे म्हणाले, 'युवकांचा सहकार चळवळीत सहभाग वाढीच्या दृष्टीने विद्यापीठाने घेतलेला पुढाकार महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांना बँकिंगची माहिती, अनुभव देण्यासाठी करारांतर्गत निश्चितपणे प्रयत्न करू. चांगले मनुष्यबळही मिळेल.' अधिसभा सदस्य संजय परमणे म्हणाले, 'सहकारातील चांगली कामे मार्गी लावण्यासाठी चांगली परिसंस्था, वातावरण करू.'

यावेळी निपुण कोरे, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नागराळे, वीरशैव सहकारी बँकेचे संचालक सूर्यकांत पाटील-बुद्धीहाळकर, बँकिंगतज्ज्ञ शंकरराव मांगलेकर यांनी मनोगत व्यक्त केले. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, अरुण आलासे उपस्थित होते. गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राचे प्रा. डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले.

### सहकार क्षेत्रात कामासाठी यावे

'केंद्रस्थानी विद्यार्थीच राहिला पाहिजे, हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना क्षमता लक्षात आणून द्यावी. त्यांनी सहकारात कामासाठी पुढे यावे' असे आवाहन डॉ. शिर्के यांनी केले.

19 OCT 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना सहकार क्षेत्रात पोषक वातावरण

## कुलगुरू डॉ. शिर्के : कोल्हापूर जिल्हा नागरी बँक असो. समवेत विद्यापीठाचा सामंजस्य करार

**कोल्हापूर :** सहकारी संस्था आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यादरम्यान सहकार्य वृद्धी करत असताना केंद्रस्थानी विद्यार्थीच राहिला पाहिजे, ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमता लक्षात आणून देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांनी सहकारी क्षेत्रात काम करण्यासाठी यावे, यासाठी पोषक वातावरण निर्माण करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्या दरम्यान बुधवारी सकाळी सहकार्यवृद्धीच्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. यावेळी कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाचा आणि परिसरातील सहकारी क्षेत्राचा स्थापनेपासून सौहार्द आहे. विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हा सहकारी क्षेत्राच्या सहकार्यातून उभा करण्यात आला आहे. सामंजस्य करारामुळे शैक्षणिक, तसेच बँकिंग क्षेत्रातील सहकार्याचा मार्ग अधिक विस्तारतो आहे, ही बाब महत्त्वाची आहे. यापुढील काळात सहकारी क्षेत्राकडे अधिक लक्ष केंद्रित करून त्यांच्या अपेक्षा जाणून घेऊन त्या दृष्टीने अभ्यासक्रमात समावेश करता येऊ शकेल. सहकारी क्षेत्रातील संधींबाबत विद्यार्थी अनभिज्ञ असतात. त्यांना त्याबाबत अवगत करून या क्षेत्रात येण्यास प्रोत्साहित करता येईल. शिकत असतानाच इंटर्नशिपची संधी देऊन प्रात्यक्षिकीय अनुभव घेण्याची संधी देता येईल. विशेषतः विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून अनेक महिला वाणिज्य व व्यवस्थापनाचे शिक्षण घेत आहेत. त्यांनाही या इंटर्नशिपमध्ये सामावून घेता येईल.

निपुण कोरे म्हणाले, युवकांचा सहकार चळवळीत सहभाग वाढणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने घेतलेला पुढाकार खूप महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बँकिंगची माहिती, अनुभव देण्याच्या दृष्टीने या करारांतर्गत निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील.

अधिसभा सदस्य संजय परमणे म्हणाले, सहकार क्षेत्रातही करिअरच्या उत्तम संधी आहेत, हा संदेश तरुणांपर्यंत पोहोचविण्यासाठी या क्षेत्रात कार्यरत सर्वच घटकांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

19 OCT 2023
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वच्छ ऊर्जा निर्मितीच्या दिशेने संशोधनाची गरज

■ अमेरिकेतील नॉत्रे दॅम विद्यापीठाचे डॉ. पी. व्ही. कामत यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

संपूर्ण जगभरात ऊर्जेचे संकट भेडसावत आहे. जगाला स्वच्छ ऊर्जा निर्मितीचे पर्याय शोधण्याची निकड भासत आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी संशोधन करण्याची गरज आहे, अशी अपेक्षा आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ व अमेरिकेतील नॉत्रे दॅम विद्यापीठाचे डॉ. पी. व्ही. कामत यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागाने 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ ॲकॅडेमिक नेटवर्क' अर्थात 'ग्यान' उपक्रमांतर्गत आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. या उपक्रमात डॉ. कामत 'ॲडव्हान्स्ड फंक्शनल मटेरियल्स अन्ड ग्रीन एनर्जी स्ट्रॅटेजीस्' या विषयावर व्याख्याने देणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. कामत म्हणाले, नजीकच्या काळात वाढत्या उर्जेची गरज भागविण्यासाठी पर्यावरणीयदृष्ट्या आपल्याला स्वच्छ उर्जेचे पर्याय शोधावे लागणार आहेत. त्यासाठी पायाभूत सुविधांपासून ते हरित उर्जा निर्मितीपर्यंत सर्वच क्षेत्रांमध्ये नवसंशोधनाची गरज निर्माण झाली आहे. जगभरातील संशोधन या दिशेने केंद्रित झालेले आहे. आपल्या विद्यार्थ्यांनाही येथे संशोधनाची पुरेपूर संधी आहे. ती त्यांनी घेतली पाहिजे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले पाहिजेत आणि त्यांची उत्तरे प्राप्त करण्यासाठी पाठपुरावा केला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.



कोल्हापूर : 'ग्यान' कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात मार्गदर्शन करताना अमेरिकेतील नॉत्रे दॅम विद्यापीठाचे डॉ. पी. व्ही. कामत. सोबत डॉ. सागर डेळेकर, डॉ. कैलास सोनावणे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे , डॉ. केशव राजपुरे.

माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, जागतिक स्तरावर शाश्वत विकासाच्या प्राधान्यक्रमावर स्वच्छ उर्जा हा विषय सातव्या स्थानी आहे. जी–२० परिषदेने मानवजातीसमोरील समस्यांचे नव्याने अधोरेखन केले आहे. त्यावर उपाययोजना करण्यासाठी धोरणात्मक बदलांची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने संशोधकांनी प्रयत्न करावेत.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, संशोधकांच्या पिढीने शाश्वत विकासासाठी आग्रही राहिले पाहिजे. त्या दृष्टीने नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत विद्यापीठात अभ्यासक, संशोधकांचे ॲकाडमिक वर्तुळ कार्यरत करण्यात आले आहे. त्याचा विस्तार करीत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्याचा मानस आहे.

कार्यशाळेचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनावणे यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठाचे 'ग्यान' समन्वयक डॉ. केशव राजपुरे यांनी आभार मानले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील पुस्तकाचे प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या वतीने गुरुवारी (दि.१९) सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृह येथे 'सावित्रीबाई फुले : हर लाईफ, हर रिलेशनशिप, हर लिगसी' या विषयावरील पुस्तकाचे प्रकाशन आणि चर्चासत्राचे आयोजन केले आहे. याप्रसंगी लेखिका रीटा राममूर्ती गुप्ता प्रमुख उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असतील. चर्चासत्रात 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांच्यासह मान्यवर सहभागी होणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले आहे.

तरुण भारत

# सावित्रीबाई फुलेंवरील इंग्रजी ग्रंथाचे आज विद्यापीठात वाचन आणि चर्चा

- लेखिका रिता गुप्तांसह मान्यवरांचा सहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

लेखिका रिता राममूर्ती गुप्ता यांनी क्रांतीज्योती



सावित्रीबाई फुले यांच्यावर इंग्रजी भाषेत लिहिलेल्या 'सावित्रीबाई फुले : हर लाईफ, हर रिलेशनशिप, हर लेगसी' या ग्रंथावर आज गुरूवारी (दि. १९) शिवाजी विद्यापीठात वाचन आणि चर्चा होणार आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंत थोरात आणि डॉ. भारती पाटील उपस्थित राहून चर्चेत सहभागी होणार आहेत. त्याबरोबर लेखिका रिता गुप्ता या देखील ग्रंथ निर्मिती मागची कथा सांगणार आहेत. सावित्रीबाई फुले यांच्यावर मराठी भाषेत विपुल साहित्य उपलब्ध आहे. पण इंग्रजी भाषेतील हा ग्रंथ सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती देशच नव्हे तर जगभर नेण्यास उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा लेखिका रिता गुप्ता यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

19 OCT
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्ह

# युवा महोत्सवात दूधसाखर महाविद्यालयाचे यश

प्रतिनिधी
सरवडे

शिवाजी विद्यापीठाचा ४३ वा मध्यवर्ती युवा महोत्सव दहिवडी कॉलेज दहिवडी येथे नुकताच संपन्न झाला. या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये बिद्री ता.कागल येथील दूधसाखर महाविद्यालयाने यश मिळवून यशाची परंपरा कायम ठेवली.



बिद्री : शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवात यश प्राप्त विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी संस्था अध्यक्ष के. पी. पाटील व इतर

या महाविद्यालयाने पथनाट्य या कलाप्रकारात तृतीय क्रमांक, वादविवाद स्पर्धेत द्वितीय क्रमांक तर हिंदी वक्तृत्वमध्ये तृतीय क्रमांक मिळविला. यामध्ये पथनाट्य उमेश कांबळे, प्रणय पाटील, शिवप्रसाद पाटील, किरण देसाई, ऋषिकेश बारड, ऋतुजा पाटील, रेहाना मुल्लानी, प्रार्थना कांबळे, सोनाली साळवी आणि नम्रता देसाई, वादविवाद मध्ये अंजली मांगोरे ,मधुरा पाटील तर हिंदी वक्तृत्व मध्ये प्राची शिंदे यांनी यश मिळवले.

या सर्वांना सांस्कृतिकविभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. एस. पाटील, सदस्य डॉ.डी. एन. पाटील ,डॉ. एस. एन. झेंडे, प्रा.संपदा वारके, माजी विद्यार्थी युवराज डावरे, अधीक्षक एस. के. पाटील, संजय जोशी, बाबासो पोवार यांचे मार्गदर्शन व संस्थाध्यक्ष के.पी. पाटील, उपाध्यक्ष विठ्ठलराव खोराटे, कार्यकारी संचालक के.एस. चौगले, व्यवस्थापकीय संचालक आर. डी.देसाई,सचिव एस. जी. किल्लेदार, सर्व संचालक मंडळ व प्राचार्य डॉ. संजय पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.

या यशाबद्दल संस्थाध्यक्ष के.पी. पाटील यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शकांचा सत्कार करण्यात आला.

तरुण भारत

# मुरगूडच्या मंडलिक महाविद्यालयात २० व २१ रोजी विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा

वार्ताहर
मुरगूड

शिवाजी विद्यापीठांतर्गत, कोल्हापूर विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा (पुरुष विभाग) शुक्रवार दि. २० व शनिवार २१ रोजी होणार आहेत. स्पर्धेचे उद्‌घाटन जय शिवराय एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष ॲड. वीरेंद्र मंडलिक यांच्या हस्ते होणार असून, महाविद्यालयीन कोल्हापूर जिल्ह्यातील संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेतून प्रथम येणारे चार संघ आंतरविभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरतील.

स्पर्धेच्या नियोजनासाठी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक व स्पर्धा सचिव प्रा. डॉ. शिवाजी पोवार, स्पर्धेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, शिवराज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य महादेव कानकेकर, संभाजी मांगले, श्रावण कळांद्रे, विनोद रणवरे कष्ट घेत आहेत.

मुरगूडात अनेकवेळा कुस्त्यांची दंगल होते. या शहराने व्हॉलीबॉल स्पर्धेत राज्य –राष्ट्रीय पातळीवर गाजलेले खेळाडू व स्पर्धाही यशस्वी केल्या. शिवाजी विद्यापिठाच्या होणाऱ्या विभागीय स्पर्धाच्या निमित्ताने क्रीडा शौकिनांना पर्वणी मिळणार आहे.

तरुण भारत

# दूधसाखर महाविद्यालयात शनिवारी मराठी भाषा शिक्षक प्रशिक्षण

सरवडे : बिद्री ता. कागल येथील दूधसाखर महाविद्यालयात २१ ऑक्टोबर रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मराठी भाषा अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर,शिवाजी विद्यापीठ मराठी भाषा शिक्षक संघ,कोल्हापूर व दूधसाखर महाविद्यालय,बिद्री यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा शिक्षक प्रशिक्षण आयोजित केले आहे. हे प्रशिक्षण शनिवार २१ रोजी सकाळी ९ ते सायं.५ या वेळेत होणार असून उद्घाटन मराठी भाषा अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे अध्यक्ष प्रा.डॉ.रणधीर शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. 'कविता व कादंबरीचे अध्यापन' या विषयावर प्रा.डॉ.नंदकुमार मोरे प्रमुख, मराठी भाषा विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे बीजभाषण करणार आहेत. अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.संजय पाटील, प्राचार्य दूधसाखर महाविद्यालय, बिद्री हे असतील.या प्रशिक्षणाला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, सांगली,सातारा या कार्य क्षेत्रातील मराठी विषयाचे सुमारे १०० शिक्षक उपस्थित राहणार आहेत.अशी माहिती समन्वयक प्रा. डॉ. आनंद वारके व प्राचार्य डॉ.संजय पाटील यांनी दिली आहे.